विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# जालना-मंठा मार्गावरील मंठा चौफुली व वाटुर बस थांब्यांवर प्रवाशांची गैरसोय; प्रवाशी त्रस्त

## वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची प्रवाशांची मागणी





थांब्यापुर्वीच बस थांबवून प्रवाशांना उतरवून देतांना बस पहिल्या छायाचित्रात तर दुसऱ्या छायाचित्रात हात दाखविल्यानंतरही न थांबणारी बस, तर तिसऱ्या छायाचित्रात मोबाईलवर बोलतांना चालक.

**दीपक शेळके**

**जालना** - जालना-मंठा महामार्गावरील मंठा चौफुली आणि वाटुर फाटा येथील बस थांब्यांवर बस थांबत नसल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि विद्यार्थ्यांना याचा मोठा फटका बसत आहे. या भागातून प्रवास करणाऱ्या अनेक प्रवाशांनी वारंवार ओरड करूनही याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

या मार्गावरून जाणाऱ्या काही बसचे चालक थांब्यावर वाट पाहणाऱ्या प्रवाशांची कोणतीही तमा न बाळगता पुढे निघून जातात. अनेकदा तर चालक मोबाईलवर बोलत असल्याने त्यांना प्रवाशांचे हात दाखवणेही दिसत नाही, मोबाईलवर बोलून ते चालक प्रवाशांचा जीव धोक्यात घालत आहेत. असा अनुभव प्रवाशांनी सांगितला. यामुळे बस थांब्यावर उभे असलेले प्रवासी ताटकळत राहतात. विशेष म्हणजे वाटुर येथे तर प्रवाशांना उतरायचे असेल तर थांब्याच्या अगोदरच काही अंतरावर गाडी थांबवून त्यांना उतरवण्यात येते.

बस थांब्यांवर बस न थांबल्याने प्रवाशांना खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागतो.

याचा फायदा घेत खासगी वाहनधारक अव्वाच्या सव्वा भाडे आकारतात. महत्त्वाचे म्हणजे या मार्गावर जवळपास सव्वाशेवर खाजगी वाहने ही जालना- रामनगर, जालना-वाटुर, जालना-मंठा अशी प्रवासी वाहतूक करताहेत. त्यामुळे काही नागरिकांनी यामागे एसटी विभागातील काही अधिकारी आणि खासगी वाहनधारकांचे हितसंबंध असल्याचा संशय व्यक्त केला आहे.

या संदर्भात जेव्हा आगार प्रमुखांशी संपर्क साधला जातो, तेव्हा ते तक्रार आल्यानंतर कारवाई करण्याचे आश्वासन देतात. मात्र, ह्या तक्रारी नेमक्या कराव्या कुणी, बस मध्ये प्रवास करणारे प्रवाशी हे सर्वसामान्य असतात. त्यांना त्यांचे काम धंदा करुन पोटा पाण्याचे पडलेले असे. दुसरा विषय म्हणजे मंठा अथवा त्या भागातील इतर गावखेड्यातून जालना येथे रुग्णालयात उपचार घेण्यासाठी आलेले ग्रामस्थ असतात. मुळात आगार प्रमुखांना नंबर मिळविणे तक्रार करणे हे त्यांना शक्य आहे का? ऑनलाईन तक्रारीच्या भानगडीत ते पडतात का? किंवा तक्रार करता येते हे त्यांना माहिती आहे का? असे एक ना अनेक प्रश्न निर्माण होतात.

याबाबत तक्रार करावी अशा सूचना कुठल्या थांब्यावर आहेत का? मुळात आगार प्रमुखांनीच वेळोवेळी पाहणी करुन प्रवाशांच्या गैरसोयीबद्दल माहिती घेणे आणि त्या सोडविण्यावर भर दिल्यास अशा समस्या निर्माण होणार नाहीत.

या सर्व प्रकारामुळे जालना-मंठा मार्गावरील प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी आहे. या प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेऊन, संबंधित बस चालक आणि दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाइ करावी, अशी मागणी जोर धरत आहे. तसेच, भविष्यात अशी घटना पुन्हा घडू नये यासाठी योग्य उपाययोजना करावी, असेही नागरिक म्हणाले.

## लठ्ठ बालके ...

सर्वेक्षण विदारक
बालके होती लठ्ठ
वाढते असे प्रमाण
रे समस्या गलेलठ्ठ
भावी रोगांचे मूळ
बुध्दी बनवते मठ्ठ
दुर्लक्ष करी पालक
का कान बधीरधट्ट
मैदानी खेळ नाही
मोबाईल स्नेह घट्ट
थातूर मातूर खाणे
पुरवत राहतो हट्ट
चॉकलेट न् गोळ्या
क्षणात करती गट्ट
फास्ट फूडचे लाड
खातात फटा फट्ट
टिव्ही पहात जेवण
रे अन्नाशी झटापट्ट
वेळी अवेळी खाणे
कपडे लगेचचं घट्ट
आपणचं ओढावतो
अकारण रे आरिष्ट
साधे सरळ जीवन
करुन बसतो क्लिष्ट
निरोगी हवीत मुले
भले बनो धष्ट पुष्ट
चाणाक्ष जे पालक
पिढी करी उत्कृष्ट

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

झाडे लावा
झाडे जगवा

आ. अर्जुनराव खोतकर यांच्या मागणीची दखल

# वानरांचा बंदोबस्त करण्यासाठी आज मंत्रालयात बैठक

**जालना । प्रतिनिधी** - वानर या प्राण्यांकडून शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याने शेतकरी अत्यंत त्रस्त झाले आहेत. वानरांचा कायदेशीर बंदोबस्त करण्याची मागणी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी केल्यामुळे वनमंत्री गणेशराव नाईक यांनी उद्या दिनांक १२ सप्टेंबर रोजी मंत्रालयात वरिष्ठ अधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक आयोजित केली आहे.

वानरना पकडून त्यांना अधिवासात (जंगल) नेऊन सोडण्याचा निर्णय यापूर्वी वन्यजीव संरक्षक कायदे अंतर्गत तरतुदीनुसार घेण्यात आला होता. सदरील उपद्रवी प्राण्यांना पकडण्याचे अधिकार मुख्य वनसंरक्षकांना प्रदान करण्यात आले होते. तसेच प्राणी पकडण्यासाठी लागणारा निधीही शासकीय योजनेतून दिला जात होता. परंतु तो निर्णय रद्द करण्यात आला आहे. त्यामुळे उपद्रवी प्राण्यांचा त्रास खूप वाढला आहे. शेतकरी वर्गातून या प्राण्यांचा बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी आमदार अर्जुनराव खोतकर यांच्याकडे करण्यात आली होती. शेतमालाचे प्रचंड नुकसान होत असून वानरांचा खूप त्रास वाढला असुन या प्राण्यांकडून मोठे नुकसान होत आहे. शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे आमदार खोतकर यांनी वनमंत्री गणेशराव नाईक यांची भेट घेऊन निवेदन दिले. याबाबत वनमंत्री नाईक यांनी तात्काळ दखल घेत १२ सप्टेंबर, शुक्रवार रोजी मंत्रालयात महत्त्वाची बैठक आयोजित केली आहे. या बैठकीस वनमंत्री गणेशराव नाईक,



आमदार अर्जुनराव खोतकर यांचेसह अप्पर मुख्य वनसंरक्षक, वनबल प्रमुख मुंबई, प्रधान संरक्षण वन्यजीव नागपूर, समाधान गिरी सिल्लोड आदी उपस्थित राहणार आहेत. या माकडाचा / वानरांचा बंदोबस्त करण्याचे अधिकार मुख्य वनसंरक्षकांना देण्यात यावे तसेच त्यासाठी लागणारा निधीही तातडीने देण्यात यावा आणि उपद्रवी प्राण्यांचा बंदोबस्त करण्यात यावा, यावर या बैठकीत महत्त्वाचा निर्णय होणार आहे.

# लोकप्रतिनिधींनी सेवा समर्पण व सकारात्मक दृष्टिकोन ठेवल्यास प्रगती होईल - अरविंद देशमुख

**जालना । प्रतिनिधी** - मधूबन कॉलनी येथे माजी नगरसेविका सौ संध्या संजय देठे यांच्या प्रयत्नातून व जालना शहर महानगरपालिका आयुक्त संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली भूमिगत नाली कामाचा शुभारंभ मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

गेल्या काही दिवसात पडलेल्या पावसामुळे रस्त्यावरचे पाणी नागरिकांच्या घरामध्ये जात होते स्थानिक नागरिकांनी ही बाब नगरसेविकास व संध्या देठे यांना सांगितले असता महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली भूमिगत नाली बांधकामाचे काम मंजूर झाले या कामाचा शुभारंभ स्थानिक नागरिक यांच्या उपस्थितीत अरविंद देशमुख यांच्या शुभहस्ते उद्घाटन करण्यात आले यावेळी अरविंद देशमुख यांनी बोलताना सांगितले की लोकप्रतिनिधींनी सेवा समर्पण व सकारात्मक दृष्टिकोन ठेवल्यास पान २ वर



# जिल्ह्यात सेवा पंधरवाडा कार्यक्रम यशस्वीपणे राबविणार - भास्कर दानवे

**जालना । प्रतिनिधी** - पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचा वाढदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती हा सेवा पंधरवाडा दि.१७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशाने दिलेले सर्व कार्यक्रम महानगर जिल्ह्यात राबवून सेवा पंधरवाडा यशस्वी करा असे आवाहन भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी सेवा पंधरवाडा कार्यशाळा कार्यक्रमात बोलताना कार्यकर्त्यांना केले.

यावेळी व्यासपीठावर जालना विधानसभेचे माजी आमदार मा.कैलासजि गोरंटयाल, प्रदेश निमंत्रित सदस्य रामेश्वर पाटील भांदरगे, विजय कामड, सौ.विमलताई आगलावे, महानगर माजी जिल्हाध्यक्ष अशोक पांगारकर, सतीश जाधव, महानगर महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा शुभांगीताई देशपांडे, युवा नेते अक्षय गोरंटयाल, मंडळ अध्यक्ष सुनील खरे, संजय डोंगरे, महेश निकम, अमोल धानुरे, वसंत शिंदे, धनराज काबलीये, अर्जुन गेही, माजी सरचिटणीस देविदास देशमुख इत्यादी प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना ते म्हणाले दि.१७ सप्टेंबर रोजी जिल्हा व बूथ स्तरावर रक्तदान शिबीर, दि.१७ ते २४ सप्टेंबर आरोग्य शिबीर, दि.१७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर मा.पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या जीवनावर आधारित चित्र प्रदर्शनी, १८ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर पर्यंत रक्तदान शिबीर दुरसा टप्पा मंडळ स्तरावर घेणे, १९ व २० सप्टेंबर रोजी पंतप्रधान यांच्या जीवनावर आधारित पुस्तक व प्रदर्शन तसेच पुस्तकाचे वितरण जिल्हा स्तरावर करायचे आहे. २२ ते २३ सप्टेंबर जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींचा सन्मान, २५ सप्टेंबर पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेष पुष्पांजली तसेच एक पेड मा के नाम कार्यकर्त्यांच्या घरी स्नेह भोजन हा कार्यक्रम बूथ स्तरावर घेणे, तसेच पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे जीवन व कार्य विकसित भारत आत्मनिर्भर भारत हा कार्यक्रम जिल्हा स्तरावर घेणे, त्यानंतर ओकल फॉर लोकल प्रचार प्रसार स्थानिक मेळाव्यांचे आयोजन म.न.पा. तसेच प.स. यांच्या माध्यमातून घेणे, २७ ते २८ सप्टेंबर जिल्हा स्तरावर मेरोथोन स्पर्धा, २ ऑक्टोबर महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस पुष्पांजली व खादी वस्तू खरेदी करणे हा स्वदेशीचा नारा देणे, २९ ऑगस्ट ते २५ डिसेंबर या वेळेत महानगर स्तरावर क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणे. इत्यादी कार्यक्रम घेऊन हा सेवा पंधरवडा कार्यकर्त्यांनी यशस्वी करावा असे त्यांनी कार्यकर्त्यांना आवाहन केले.

यावेळी सोपान पेंढारकर, चंपालाल भगत, संध्याताई देठे, अरुणाताई जाधव, ममता कोंड्याल, वर्षाताई ठाकूर, सुनील पवार, शिवादादा शेजूळ, सिध्दिविनायक मुळे, माजी नगरसेवक नंदकिशोर गरदास, राज स्वामी, महावीर ढक्का, बाबू मामा पवार, बजरंग राजपूत, अशोक पवार, गणेश जल्लेवार, सनी सामलेटी, संदीप नाईकवाडे, रमेश गौरक्षक, ज्ञानेश्वर ढोबळे, शशिकांत घुगे, बाबुराव भवर, महेंद्र अकोले, राजेंद्र भोसले, राजू गवई, सुहास मुंडे, सुमित सुरडकर, उमेश अग्रवाल, गजानन खरात, कृष्णा खिल्लारे, मुकेश चव्हाण, शिवराज जाधव, सतीश केरकळ, सरपंच काकासाहेब घुले, निवृत्ती लंके, विलास खरात, प्रदीप देठे, सिद्धेश्वर हाजबे, नागेश अंभोरे, सोमेश काबलीये, डोंगरसिंग साबळे, सुदर्शन काळे, शाम उगले, गौरव गोधेकर, इत्यादीसह जालना महानगर जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी आजी-माजी न.प. जि.प. प.स.सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## विक्रमी रक्त बॅग संकलित करणार - माजी आ.कैलास गोरंटयाल

यावेळी बोलताना माजी आ.कैलासजी गोरंटयाल यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी जालना महानगर मध्ये रक्तदान शिबीर घेऊन विक्रमी रक्त बॅग संकलित करण्यात येणार आहे व जालना महानगरात भाजपा लोकनेते रावसाहेब दानवे, आ.बबनराव लोणीकर, आ.नारायण कुचे, आ.संतोष पाटील दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सेवा पंधरवाडा आपण सर्वांनी यशस्वी करून दाखववा असे आवाहन गोरंटयाल यांनी कार्यकर्त्यांना केले.

संपादकीय

# पत्रकारितेवरचा हल्ला की लोकशाहीवरचा?

परतूर तालुक्यात घडलेली घटना धक्कादायक आणि लोकशाहीस घातक ठरावी अशी आहे. एका स्थानिक पत्रकारावर वाळू माफियांनी त्याच्या पत्नीसमवेत केलेला हल्ला, जातीवाचक शिवीगाळ आणि जीवघेण्या धमक्या या केवळ एका व्यक्तीवरील गुन्हा नाहीत; तर हे पत्रकारितेच्या स्वातंत्र्यावर थेट हल्ला आहे. पत्रकार पांडुरंग शेजुळ यांनी आपल्या व्यवसायधर्माला न्याय देत स्थानिक वाळू वाहतुकीवरील बातम्या प्रसिद्ध केल्या. यातून माफियांचे हितसंबंध धोक्यात आले असतील. पण बातमी ही गुन्हा नाही; उलट समाजापुढे सत्य ठेवणे हे पत्रकाराचे कर्तव्य आहे. त्यावरून पत्रकार व त्याच्या पत्नीवर हिंसक हल्ला होणे हे प्रशासनाच्या दुर्लक्षाचे द्योतक आहे. महाराष्ट्रात अवैध वाळू उत्खनन ही मोठी समस्या आहे. यातून लाखो रुपयांचा काळा पैसा फिरतो आणि अनेकदा राजकीय छत्रछायेत हे व्यवहार चालतात. या माफियांच्या विरोधात आवाज उठवणाऱ्या पत्रकारांवर, कार्यकर्त्यांवर किंवा साध्या नागरिकांवर दबाव आणणे, धमक्या देणे आणि हल्ले करणे हे नेहमीचे झाले आहे. परंतु यापुढे अशा घटनांकडे काळजीपूर्वक पाहणे नव्हे, तर कठोर कारवाई करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. या घटनेत जातीवाचक अपशब्दांचा वापर झाल्याचेही नमूद आहे. म्हणजे केवळ गुन्हेगारी नाही, तर सामाजिक विषमता आणि दहशतही यातून उघड झाली आहे. अॅट्रॉसिटी कायद्यानुसार गुन्हा दाखल झाला असला, तरी खरे प्रश्न म्हणजे या कायद्यांची अंमलबजावणी किती कठोरतेने केली जाणार? आरोपींना लवकरात लवकर अटक होईल का? पत्रकार हे समाजाचे डोळे आणि कान आहेत. त्यांच्यावर हल्ला म्हणजे समाजाला अंध आणि बहिऱ्या करण्याचा प्रयत्न आहे. त्यामुळे ही घटना केवळ कायद्याच्या चौकटीत बसणारा गुन्हा म्हणून न पाहता, ती लोकशाहीवरील धोक्याची घंटा म्हणून पाहावी लागेल. उपविभागीय अधिकारी तपास करत आहेत ही बाब स्वागतार्ह आहे; परंतु तपासाचा गतीमान व पारदर्शक निकाल न लागल्यास समाजातील विश्वास ढासळेल. पत्रकारांच्या सुरक्षिततेची हमी सरकारने द्यावी, अन्यथा स्वातंत्र्यप्राप्त पत्रकारितेचे स्वप्न फोल ठरेल. आरोपींवर कठोर कारवाई करावी, त्यांना कायद्यानुसार शिक्षा व्हावी. अवैध वाळू उत्खननावर नियंत्रण आणावे. स्थानिक पत्रकारांना प्रशासनाने संरक्षण द्यावे. पत्रकार हा कुणाचाही शत्रू नसतो; तो फक्त समाजाचा आरसा असतो. या आरशावर दगड फेकणाऱ्यांना वेळेत रोखले नाही, तर उद्या लोकशाहीचा चेहराही रक्ताळलेला दिसेल. पत्रकार वाचला तरच लोकशाही शाबूत राहील; अन्यथा माफियांचा मक्तेदारीशाहीत समाज कैद होईल.

पान १ वरुन

## लोकप्रतिनिधींनी सेवा ...

नागरिकांच्या सोयी सुविधा बद्दल विकासाची अधिक प्रगती होईल.
या कार्यक्रमाप्रसंगी मधुबन कॉलनीतील जेष्ठ नागरिक मुक्ताराम घोडके, ज्येष्ठ नागरिक स्कूलचे संचालक शिंदे, मार्कंडे एक्का पाणी पुरवठा एजन्सीच्या संचालिका टिपरासताई महिला भगिनी उपस्थित होत्या.

# खा . संजय जाधव यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय योजनांच्या प्रलंबीत प्रश्नांवर आढावा बैठकीचे आयोजन!

**परतुर । प्रतिनिधी -** परभणी लोकसभा मतदार संघाचे विद्यमान खासदार संजय (बंडू )जाधव यांच्या अध्यक्षतेखाली व सूचनेनुसार परतूर मंठा विधानसभा मतदारसंघातील विविध शासकीय योजनांच्या प्रलंबित प्रश्नांची विषयी सविस्तर शाषकीय आढावा बैठक घेण्यात येणार आहे .

या बैठकीत परतुर - मंठा तालुक्यातील नागरी समस्या , आरोग्य,पाणी पुरवठा , ग्रामीण पायाभूत सुविधा , सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस प्रशासन जिल्हा परिषद जिल्हा परिषद विविध विभाग पंचायत समिती ,लघुपाठ पाटबंधारे विभाग(जायकवाडी), परतुर , मंठा तहसील ,कृषी विभाग,नगर परिषद परतूर,नगर पंचायत मंठा यासह शाषणाच्या विविध विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थिती राहणार आहेत . सदरील आढावा बैठक दिनांक १२/०९/२०२५ शुक्रवार रोजी सकाळी ११ : ०० वाजता तहसिल कार्यालयातील सभागृहात



आयोजित करण्यात आली आहे.

परतूर मंठा विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे प्रमुख पदाधिकारी, सर्कल प्रमुख , गावचे सरपंच, उपसरपंच,शाखा प्रमुख,विभाग प्रमुख, माविआ पक्षाचे विविध विभागाचे पदाधिकारी , कार्यकर्ते यांनी या आढावा बैठकीला आर्वजून उपस्थित रहावे असे आवाहन शिवसेनेचे जालना जिल्हाप्रमुख महेशभैय्या नळगे यांनी केले आहे.

# व्यसनाला मुठमाती देऊया आणि यशाला काबीज करूया

आजकाल शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी यशाचे व्यसन करायचे सोडून विनाशाच्या व्यसनाच्या मागे धावत पळत सुटले आहेत. आणि दारू, गांजा, तंबाखू व सिगारेट यांचे व्यसन करून स्वतःचे जीवन बरबाद करून अधोगतीला नेत आहेत. त्यांना नशाबाज व अमली पदार्थांचे व्यसन केल्याशिवाय जीवाला जराही चैन व आराम पडत नाही. आपण पाहतोय की, काही महाभाग एवढे व्यसनाधीन झालेले दिसतात की, त्यांना वेळेवर जर दारू, गुटखा, तंबाखू किंवा गांजा मिळाला नाही तर त्यांचा दिमाख व मनस्थिती व्यवस्थित काम करत नाही. ते कोणालाही न बोलता मनोरुग्णासारखे एकांतात गप्पगार बसून राहतात. नशाबाज व्यसन वेळेवर नाही सेवन केले तर त्यांच्या अंगाला थरथरी सुटते. एकदा व्यसनाच्या विखारी विळख्यात अडकलेली माणसे त्या विखारी विळख्यातून लवकर सुटतील याची शाश्वती कोणीही देऊ शकत नाही. आणि व्यसनमुक्त होण्याचे ओरिजनल औषध अजून तरी बाजारात उपलब्ध झाले नाही. आपण बारकाईने निरीक्षण केल्यावर आपल्याला असे दिसून येईल की, आजकाल मिसरूड न फुटलेले तिसरी व चौथीचे विद्यार्थी सुद्धा वाईट व्यसन करण्यात आघाडीवर आहेत. ते यशाचे म्हणजेच शालेय व शैक्षणिक अभ्यासाचे व्यसन करायचे सोडून अमली पदार्थांचे, जे की शरीराला हानिकारक आहेत, अशा नशाबाज व वाईट व्यसनाच्या आहारी जात आहेत. वर्गात बसून सुपारी, गुटखा, तंबाखू व गांजा यांचे व्यसन करत आहेत. आणि वर्गातील भिंती, कोपरे व फरशी यांच्यावर पिचकाऱ्या मारून वर्ग खोली रंगवून टाकत आहेत. म्हणजे आजकालचे विद्यार्थी चांगल्या व्यसनाच्या आहारी जायचे सोडून वाईट व्यसनाच्या आहारी लवकर जात आहेत. शाळेतील वर्ग खोल्यांमध्ये जाऊन भिंतीचे जर बारकाईने निरीक्षण केले तर आपल्याला असे दिसून येईल की, शाळेतील विद्यार्थी सुपारी खाऊन भिंतीवर थुंकत आहेत आणि वर्गाच्या भिंती लाल भडक करत आहेत. त्यामुळे सर्व भिंती रंगून गेलेल्या आपल्याला पाहायला मिळतील. असे व्यसनाधीन व नशाबाज विद्यार्थी प्रत्येक शाळेत व महाविद्यालयात आपल्याला पाहायला मिळतील. यांना वेळेवर व्यसन केल्याशिवाय मनाला शांती व समाधान मिळत नाही. ही आत्ताची पिढी व्यसनाच्या एवढी आहारी गेली आहे की, त्यांना व्यसनामुळे आपल्या शरीरावर किती हानी होते, याचे जरासे ही भान आत्ताच्या युवा पिढीला राहिले नाही.ते व्यसनाच्या आहारी जाऊन स्वतःचे भवितव्य धोक्यात घालत आहेत. अशा वाईट व नशाबाज व्यसनाने माणसाचे आरोग्य खराब होत असते, तसेच माणसाला वेगवेगळे आजार जडतात. माणूस दीर्घायुष्य जगायचे सोडून अल्पायुष्य जगतो. याचा परिणाम असा होतो की, वेळेवर लग्न न होणे, लग्नासाठी चांगले स्थळ न मिळणे आणि समाजात, गावात व पाहुण्यांच्या नजरेत आपली प्रतिष्ठा कमी होणे हे परिणाम आपल्याला भोगावे लागतात. म्हणून माणसाला जीवनात आरोग्याला धोका पोहोचणारे आणि माणसातून उठवणारे व्यसन न करता माणसाला सन्मानाने व स्वाभिमानाने माणसात बसवणारे यशाचे मंगलमय व्यसन असावे. तरच आपल्याला जीवनात किंमत आहे. नाहीतर व्यसनी माणसाला समाजात काय अस्तित्व आहे? हे आपण पाहतोय. व्यसनी माणसाच्या घरात कधीच सुख, समाधान, बरकत व शांती पाहायला मिळत नसते. त्यांच्या घरात नेहमी भांडण तंटे होतात, खाण्यापिण्याची आबाळ होते. त्या घराकडे माणूस तुच्छतेने बघतो. त्यासाठी माणसाने स्वतःच्या जीवनाचे व स्वतःच्या घराबाळाचे वाटोळे करणारे व्यसन न करता जीवनाचे भले व कल्याण करणारे चांगले व्यसन करावे, चांगले छंद जोपासावे, अभ्यासाचे व्यसन आत्मसात करावे आणि आपल्या जीवनाला घडवावे. पण मित्रहो माणसाला चांगले व्यसन लवकर न जडता वाईट व्यसनाच्या आहारी विद्यार्थी लवकर जात असतात. आणि स्वतःला विनाशाच्या खाईत लोटत असतात. माणसाला चांगले व्यसन असावे, जेणेकरून ते व्यसन केल्यावर माणसाच्या जीवनाचा कायापालट होईल. आणि तो यशोशिखरावर लीलया व सहजपणे पोहोचेल. विद्यार्थ्यांच्या जीवनातील काळोख दूर होऊन माणसाचे जीवन सुखी व आनंदी होईल. माणसाला व्यसन वाचनाचे असावे, डॉक्टर किंवा अभियंता होण्याचे असावे, वकील किंवा प्राध्यापक होण्याचे असावे, मोठा अधिकारी किंवा कलेक्टर होण्याचे असावे, मोठा लेखक किंवा वक्ता होण्याचे असावे, सामाजिक कार्यकर्ता किंवा समाजसेवक होण्याचे असावे. जेणेकरून आपल्या जीवनात सुखाचा व आनंदाचा पाऊस कायम बरसत राहील. पण आजकाल मुलांना चांगले व्यसन नको वाटत आहे. आणि वाईट व्यसनाच्या विखारी विळख्यात विद्यार्थी लवकर ओढले जात आहेत. ज्या वयात विद्यार्थ्यांनी खूप खूप अभ्यास व चिंतन करून यशाला काबीज करायला पाहिजे. स्पर्धा परीक्षेच्या मैदानात उतरून स्पर्धा परीक्षेची तयारी केली पाहिजे. पण विद्यार्थी या क्षेत्रात भरपूर वाचन व अभ्यास न करता कॉपीच्या व ग्रेसच्या जीवावर पास होत आहेत आणि सुशिक्षित बेकारांचे लेबल लावून व विकतची डिग्री घेऊन मिरवत आहेत. असेच म्हणावे लागेल. मित्रहो मग तुम्हीच सांगा, हे कॉपी बहाद्दर विद्यार्थी भविष्यात खरंच घडतील का हो? यांचे भविष्य खरंच तेजस्वी ताऱ्याप्रमाणे उज्ज्वल असेल का हो? असले व्यसनी, टवाळखोर,आवारा व मवाली विद्यार्थी आपल्या देशाचे आधारस्तंभ होतील का हो? या प्रश्नाचे उत्तर नाही असेच येणार आहे. डॉ. एपीजे अब्दुल कलाम म्हणायचे या देशाची खरी ताकद ही आजची युवा पिढी आहे. या देशातील युवकच उद्याच्या देशाचे निर्माते आहेत. या देशातील तरुण युवक जेवढे सक्षम व प्रबळ असतील तेवढा देश मजबूत व भक्कम असेल. हा देश जर आपल्याला मजबूत व भक्कम करायचा असेल तर आपल्याला वाईट व्यसनाचा त्याग करावा लागेल. दारू, गांजा, तंबाखू व सिगारेट या विखारी व्यसनाला मूठमाती द्यावी लागेल. आपल्या शरीराला हानिकारक असणाऱ्या व्यसनापासून चार हात लांब राहावे लागेल. व्यसनाच्या विखारी विळख्यात अडकून स्वतःचा विनाश करून घेण्यापेक्षा आपले भवितव्य उज्ज्वल करणारे आणि आपल्या जीवनाचे सोने करणारे पुस्तक रुपी स्वच्छ व निर्मळ व्यसन म्हणजेच ज्या व्यसनातून समाजाला व देशाला काहीतरी लाभ होईल, असे यशाचे व्यसन करून स्वतःचा, समाजाचा, गावाचा आणि देशाचा विकास साधावा...अमंगळ, दूषित, कलुषित आणि विखारी व्यसनांना कायमचे मातीत गाडूया आणि डॉक्टर, कलेक्टर, अभियंता, इंजिनीयर, प्राध्यापक, वकील, लेखक, कवी,



तहसीलदार, निस्वार्थ राजकारणी होण्यासाठी खूप खूप अभ्यास करूया...या पदांना काबीज करण्यासाठी जीवाचे रान करावे... अहोरात्र मेहनत व चिंतन करून या व्यसनाचे यशात रूपांतर करून यशाला काबीज करावे आणि हे यशाचे व्यसन जीवनभर जोपासावे.. आपल्याला एखाद्या विशिष्ट यशाला साध्य करण्यासाठी अहोरात्र परिश्रम व कष्ट करून यशाला गवसणी घालावी... वाईट व जीवघेण्या व्यसनांचा त्याग करून यशाचे व्यसन बाळगून यशाचा पाठलाग करावा आणि यशाला खेचून आणावे म्हणजे एक दिवस तुमचे नाव नक्कीच इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिले जाईल, असे मला मनोमन वाटते...आणि जर वाईट व्यसनाच्या विखारी विळख्यात अडकलात तर तरुणपणातच म्हातारे होऊन एक दिवस कायमचे मरून जाणार एवढे मात्र नक्की....

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी,ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# निर्भीड विचारांचा-धडक बेधडक

धडक बेधडक हा घनश्याम पाटील यांचा लेखसंग्रह. चपराक प्रकाशनाने तो प्रकाशित केला आहे. पाटील यांचे या आधी दखलपात्र' व दरवळ हे दोन संग्रहांचेही वाचकांनी मोठ्या प्रमाणावर स्वागत केले आहे.

गेल्या २३ वर्षापासून ते पूर्णवेळ पत्रकारिता क्षेत्रात आहेत. तरुण भारत, केसरी, या वर्तमानपत्रापासून त्यांच्या पत्रकारितेचा प्रारंभ झाला. निर्भीड पत्रकारिते करीता स्वर्गीय माधवराव गडकरी पत्रकारिता पुरस्कार त्यांना मिळाला आहे. माधवराव गडकरी यांच्याप्रमाणेच घनश्याम पाटील हे बेधडक आणि निर्भीडपणे विचार मांडताहेत हे सांगायला नको.




या लेखसंग्रहात एकूण २२ लेख आहेत. जगाला हेवा वाटावा अशी सेटलमेंट मला करायची आहे -राज ठाकरे, सर्व काही किंवा काहीही- शरद पवार, शिवसेनेची आयडियालॉंजी कोणती ?, राष्ट्रवादीची बोलकी बाहुली- सुप्रिया सुळे, यांच्या राजकीय प्रवासावरील लेख यात आहेत. तसेच संसद दुबळी करणार का?, व्यवस्थेची एक्सपायरी डेट,, विधान परिषद बरखास्त करा, आवाजाची नाही तर सभागृहाची उंची वाढवा, नाकर्ती घराणी नाकारा, भ्रष्टपणाची एजंटगिरी, मनोहरी नौटंकी, हा तर महाराष्ट्राचा अपमान, असे परखड लेख या संग्रहात आपल्याला वाचायला मिळतात. त्या त्या वेळच्या परिस्थितीवर त्यांनी आपल्या लेखात आपले विचार व्यक्त केले आहेत.भाष्य केले आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या स्थापनेपासून राज ठाकरे यांनी सतत भूमिका बदलली आहे. फक्त उत्कृष्ट वकृत्व ही गोष्ट नेतृत्वाला पुरेशी नाही.ज्यांना स्वतःला भीती वाटते ती व्यक्ती नेतृत्व करू शकत नाही. लोकांना फक्त विकासाची ब्लू प्रिंट देऊन चालत नाही तर ती स्वप्न सत्यात आणण्यासाठी प्रयत्न करावे लागतात सतत जनतेत मिसळून त्यांचे सुखदुःख,प्रश्न समजून घ्यावे लागतात. दुसऱ्याच्या नकला करणे म्हणजे पक्ष चालवले नाही. एक चांगला नेता चांगला मराठी माणूस महाराष्ट्रातल्या नव्या पिढीला अपेक्षित आहे.ईश्वरी कृपेने आपल्याकडे वकृत्व आहे तेव्हा या गोष्टीकडे लक्ष देणे आवश्यक आहे अशी भावना लेखात व्यक्त केली आहे. आपण बघतो लाखोच्या संख्येने सभांना गर्दी असते पण हजाराच्या संख्येने ते मतात परावर्तित होत आहेत

शरद पवार यांच्या राजकारणात प्रवेशाला चार तपे उलटून गेली आहेत.३८ व्या वर्षी महाराष्ट्राचे ते मुख्यमंत्री झाले. अनेक महत्त्वाचे खाती सांभाळले. तरी पण ते पंतप्रधान पदापर्यंत पोहोचू शकले नाहीत न झालेले सर्वोत्तम पंतप्रधान असे त्यांना म्हटले जाते. यशवंतराव चव्हाण यांच्या सोबत त्यांनी राजकारणात प्रवेश केला परंतु शेवटपर्यंत ते त्याच्या सोबत राहिले नाही. शरद पवाराच्या भोवती कधी चांगले लोक जमलेत असे चित्र नाही. चांगली टीम गोळा करायची त्यांच्याकडून चांगलं काम करून घ्यायचं हे त्यांना कधीच जमल नाही. शरद पवारांनी वसंतदादा पाटील यांच्या पाठीत खंजीर खुपसला, वसंत दादांना राजकारणातून बाजूला करण्यासाठी डाव त्यांनी साधला त्यानंतर पवारांची विश्वासार्हता जी लयाला गेली ती अजूनही त्यांना मिळवता आली नाही, असे त्यांनी स्पष्ट मत मांडले आहे.

यशवंतराव चव्हाण यांच्याकडे एक विचार होता एक संस्कार होता त्यांचे कृष्णाकाठ हे आत्मचरित्र वाचताना त्यातला निर्मळपणा प्रामाणिकपणा मनावर बिंबतो.

तर लोक माझे सांगाती वाचताना पवारांच्या अशा असंख्य उठाठेवीच डोळ्यासमोर येतात. गेल्या साठ वर्षाचा विचार करता पवाराच्या राजकारणातले सर्व प्रकारचे दोष ठळकपणे दिसून येतात. लबाड, स्वार्थी, घराण्याच्या निर्माण करणार हे नेतृत्व आहे.

जातीयवाद आणि विशेषतः ब्राह्मण द्वेष अनेकदा दिसून येतो। महाराष्ट्राच्या राजकारणात लक्षात राहतील अशा कोणत्याही गोष्टी त्यांनी महाराष्ट्राला दिले आहे असे दिसत नाही.छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास जपण्यासाठी त्यांनी काही केलं नाही, की महाराष्ट्राचा भविष्यकाळ घडवण्याचा व्हिजन त्यांनी कधी महाराष्ट्रा दिले नाही.

शिवसेनेत घराणेशाही राहणार नाही जातीधर्माच्या पलीकडे जाऊन पक्ष उभा करु हा विचार बाळासाहेबांना अभिप्रेत होता परंतु उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्या पर्यंत शिवसेना बदलली. मराठी माणूस आणि त्याचा स्वाभिमान यासाठी स्थापना झाली होती मराठी माणसाला मोठा करण्याचे स्वप्न बघत हा पक्ष स्थापन झाला आणि तरुणाची एक मोठी फळी उभी राहिली. परंतु या दुर्लक्ष करत सेनेने घराणे मोठे केले. शिवसेना त्याच्या स्वतःच्या नेत्यांनी मोठे होऊ देत नाही. उद्धव ठाकरे यांचे एखादे अभ्यासपूर्ण भाषण कधी गाजले का? तसेच बाळासाहेबांनी अनेकांवर टीका केली ती तरी त्यांच्या लक्षात आहे का? असा प्रश्न त्यांनी केलेला आहे. शिवसेना आता विसर्जन करण्याची वेळ आलेली आहे असा विचार व्यक्त केला होता आज परिस्थिती आपल्यासमोर आहे.

राष्ट्रवादीची बोलकी बाहुली हा सुप्रिया सुळे यांच्या राजकीय कारकीर्दि वरील लेख. शरद पवारांना भेटायला येणाऱ्या लोकांबरोबर फोटो काढून घ्यायचे आणि ते ट्विटर, फेसबुकवर, इंस्टाग्राम वर अपलोड करायचे यापेक्षा त्यांचं सामाजिक कार्य आहे का? एखाद्या वक्त्याकडे सहज सभा जिंकण्याचे कौशल्य असावे लागते तेही त्यांच्याकडे नाही. राजकारण म्हणजे संधी असते त्या संधीच सोनं करायचं ही ती मातीमोल ठरवायची

हे ज्याचं त्याचं त्यांनी ठरवायचं असतं. अधिकार गेले की शब्दशः कोणीच विचारत नाही. त्यामुळे शरद पवारांबरोबर पुढची काही वर्ष तुम्ही टिकून राहू शकाल पण ते शाश्वत नसेल. महापुरुषही काळासोबत कसे नष्ट होतात याबाबत त्यांनी रायकीणीकरांचे एक निरीक्षण नोंदवले तेवढे दोन ओळी समजून घेण्या एवढ्या आपण समर्थ आहात असे ते म्हणतात

कोरुन शिळेवर जन्म मृत्यूची वार्ता
जा ठेवा त्या जागेवर पणती आता
वाचेल कोणीतरी होताना उत्खनन
म्हणतील कोण हा कशास याचेच स्मरण

विधानपरिषद बरखास्त करा हा लेख विचार करायला लावणारा आहे. कारण विधान परिषदेमध्ये खूप काही साध्य होते अशातला भाग नाही. काही लोकांची वर्णी लावणे, असंतुष्ट लोकांना संतुष्ट करण्यासाठी विधान परिषदेचा उपयोग केला जातो, हे सर्वश्रूत आहे.

कला साहित्य क्रीडा कृषी वैद्यकीय क्षेत्रातील लोकांचा यात समावेश किती होतो? आणि ते काय कार्य करतात.?

सुबह सुबह की बात है, संसद दुबळी करणार का ?मनोहरी नौटंकी, हा यशवंत मनोहर यांचे पुरस्कार नाकारणारी भूमिका, लिहिलेले काही विशेष लेख आहेत. आवाजाची नव्हे तर सभागृहाची उंची वाढवा, या लेखात ते म्हणतात विधिमंडळ हे महाराष्ट्रातल्या १२ कोटी जनतेच्या प्रश्नाचं आणि अशा आकांक्षाचा प्रतिनिधित्व करणारे सभागृह आहे. महत्वाचे प्रश्न हाताळण्या ऐवजी,टिकाटिप्पण्या,आरोपप्रत्यारोप करण्यातच सभागृहाचा वेळ जातो. अधिवेशन बंद करा आणि त्या ठिकाणी मनोरंजनाचे कार्यक्रम करा निदान जनतेला तुमच्याकडून अपेक्षाभंगाचे दुःख होणार नाही या शब्दात त्यांनी सभागृहाविषयी लिहिले आहे.

घनश्याम पाटील आपल्य मनोगतच म्हणतात एखाद्या घटनेविषयी किंवा प्रसंगा विषयी किंवा भूमिके विषयी जर कोणी स्पष्ट विचार मांडले तर विचार मांडणाऱ्यांना धमक्या देण्याचा प्रकार करत असाल तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या आणि इथल्या संतांच्या विचारांचा तुम्हाला विसर पडला आहे आणि त्यांचं नाव घ्यायचा तुम्हाला अधिकार नाही अशा शब्दात ते आपल्या भावना व्यक्त करतात.

एखाद्या व्यक्तीचा लेखन आवडलं नाही म्हणून त्याच्याशी वैचारिक वाद आणि प्रतिवाद करा पण आम्ही त्यांना बघून घेऊ, मारू धमक्या देऊ, तुमच्याशी मारामारीच करू असं तुम्हाला वाटत असेल तर या देशातल्या निवडणुकां बंद करून टाका.अशा प्रवृत्ती जर वर येत असतील तर त्यांना थांबवण्याची जबाबदारी इथल्या प्रत्येक सुजाण नागरिकाची आहे आपण ज्या वेळेला छत्रपती शिवाजी महाराज शाहू फुले आंबेडकरांचे नाव घेतो तेव्हा एका स्वप्न आपल्या डोळ्यासमोर असतो आज असलेली एकूण परिस्थिती लक्षात घेता उद्याच्या पिढीचा उज्वल भवितव्याचा विचार करायचा वर्तमानाची कठोर चिकित्सा करणे आवश्यक आहे म्हणून म्हणून राजकीय परिस्थिती भाष्य करणे मला गरजेचे वाटते आणि म्हणून मी ते केले. प्रेम वाढीस लागावे हा माझ्या लेखणीचा मूळ मंत्र आहे. यातील टीका कुणाचे आकसापोटी नाही.तर पत्रकार म्हणून तटस्थपणे मला जे दिसले ते मांडण्याचा प्रयत्न आहे. त्यातील सकारात्मक भाग समजून घेतला तर उद्याच्या उज्वल भवितव्यासाठी तो पोषक ठरणार आहे. शेवटच्या मनावर जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांच्या अभंग ओळी सूचक आहेत.

सुजाण वाचकांनी हा संग्रह जरुर वाचावा.

धडक बेधडक.(लेखसंग्रह )
घनश्याम पाटील, चपराक प्रकशन. पुणे.
मुल्य.३००/-

दिलीप देशपांडे.
जामनेर. जिल्हा जळगाव.
मोबा.,८९९९५६६९१७
dilipdeshpande24gmail.com

### अनुदानापासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांना तात्काळ अनुदान वाटप करा

# चौकशी समितीचे काम वेगाने पूर्ण करा

### आमदार लोणीकर यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यात २०२३ - २०२४ या कालावधीत अतिवृष्टी, गारपीट आणि अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांना मंजूर करण्यात आलेल्या अनुदान वाटपात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे उघड झाले आहे. या घोटाळ्यात अंबड व घनसावंगी तालुक्यानंतर आता भोकरदन व जाफराबाद तालुक्यातील तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक आणि इतर महसूल अधिकाऱ्यांचा सहभाग असल्याचे समोर आले आहे. यापूर्वी ७९ कोटींहून अधिकचा आर्थिक घोटाळा उघडकीस आला असून आता भोकरदन व जाफराबाद तालुक्यांमध्ये देखील घोटाळा झाला असल्याची शक्यता आहे. राज्यभरात प्रचंड चर्चा झालेल्या अंबड व घनसांगी तालुक्यातील घोटाळ्यामध्ये आतापर्यंत २८ जणांवर गुन्हे दाखल झाले आहेत. त्याप्रमाणे भोकरदन व जाफराबाद तालुक्यातील दोषी असलेल्या ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, कृषी सहाय्यक, ऑपरेटर्स यासह महसूलच्या अधिकाऱ्यांवर चौकशी अंति गुन्हे दाखल करण्यात यावे अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी केली.

**घोटाळ्याचे स्वरूप आणि प्रमाण-** जालना जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. शासनाने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सुमारे ४१२ कोटी रुपयांच्या अनुदानाची तरतूद केली होती. मात्र, या अनुदान वाटपात भ्रष्ट अधिकाऱ्यांनी संगनमताने ७९.६७ कोटी रुपयांचा अपहार झालेला असून तेवढाच अपहार जिल्ह्यातील इतर तालुक्यांमध्ये देखील झालेला असल्याची शक्यता आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केली. या अनुदान घोटाळ्यामध्ये झालेली मुख्य अनियमितता खालीलप्रमाणे आहेत:



**बोगस लाभार्थी:** शेती नसलेल्या व्यक्तींना, इतर गाव-तालुका-जिल्ह्यातील लोकांना आणि मृत व्यक्तींच्या नावे अनुदान वाटप.

**दुबार पेमेंट:** बोगस आधार क्रमांक वापरून एकाच व्यक्तीला दुबार अनुदान देणे.

**ओवररिपोर्टिंग:** कोरडवाहू किंवा कमी शेती असलेल्या जागेवर जास्त शेती दाखवून फळबाग अनुदान घेणे.

**फेक दस्तऐवज:** ७/१२ उतारे आणि इतर दस्तऐवजांमध्ये फेरफार करून अपात्र व्यक्तींना पात्र ठरवणे.

या घोटाळ्यात अंबड, घनसावंगी, भोकरदन आणि जाफराबाद तालुक्यांचा मुख्य सहभाग असल्याचे उघड झाले आहे. आतापर्यंत ३४.९७ कोटी रुपयांची वसुली करण्यात आली असून, आणखी चौकशी सुरू आहे.

जालना जिल्ह्यात यापूर्वी निष्पन्न झालेल्या अतिवृष्टी घोटाळ्या प्रमाणेच भोकरदन व जाफराबाद तालुक्यातील महसूल अधिकाऱ्यांचा या घोटाळ्यात थेट सहभाग असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येत आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातून जारी करण्यात आलेल्या पत्रानुसार, भोकरदन तालुक्यातील १५ गावांतील ७४५ लाभार्थींची तपासणी करण्यात आली असून, नावे आणि पोर्टलवरील यादीत तफावत आढळून आली आहे अशीच तफावत जाफराबाद तालुक्यातील याद्यांमध्ये देखील दिसून येत आहे. यामध्ये बोगस लोकांना पैसे देणे, इतर जिल्ह्यातील व्यक्तींना अनुदान वाटप आणि आधार क्रमांकांमध्ये फेरफार यासारख्या अनियमितता उघड झाल्या आहेत. उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आलेल्या पत्रात या तफावतींबाबत स्पष्टीकरण मागवण्यात आले असून, संबंधित महसूल अधिकाऱ्यांना हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. भोकरदन तहसीलदारांना या प्रकरणात खुलासा सादर करण्यास सांगण्यात आले असून, जाफराबाद तहसीलदारांना अद्याप पर्यंत खुलासा करण्यासंदर्भातील आदेश प्राप्त झाले किंवा नाही हे कळू शकले नसले तरी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईचा फास आवळला जाण्याची शक्यता आहे. जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी आपण अतिवृष्टी अनुदान पासून वंचित असून प्रत्यक्षात ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहेत त्या सर्व शेतकऱ्यांना तात्काळ अनुदान उपलब्ध करून देण्यासाठी आपण शासन स्तरावर प्रयत्न करावे अशी मागणी देखील जिल्हाभरातील शेतकऱ्यांनी माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर व जिल्हाधिकारी जालना यांच्याकडे केली असल्याचे आमदार बबनराव लोणीकर म्हणाले.

**आमदार बबनराव लोणीकर यांची भूमिका**

परतूर विधानसभा मतदारसंघाचे भाजप आमदार बबनराव लोणीकर यांनी या घोटाळ्याचा पर्दाफाश करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या अथक पाठपुराव्याने हा भ्रष्टाचार उघड झाला असून, त्यांनी विधानसभेतही हा मुद्दा उपस्थित केला आहे. लोणीकर म्हणाले, हा घोटाळा शेतकऱ्यांच्या रक्त आणि घामाची लूट आहे. अनुदान वाटपात भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यांना कठोर शिक्षा व्हावी आणि ड्खढ चौकशी व्हावी. त्यांनी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांसह उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचाही सहभाग असण्याची शक्यता व्यक्त केली आहे. आतापर्यंतच्या चौकशीत ७४ जण दोषी आढळले असून, लोणीकर यांच्या दबावामुळे कारवाई वेग घेत आहे असे असले तरी यापेक्षा अधिक वेगाने चौकशी होणे अपेक्षित असल्याचे आमदार बबनराव लोणीकरांचे म्हणणे आहे.

जालना जिल्हाधिकारी कार्यालय येथे संपन्न झालेल्या बैठकीदरम्यान राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या प्रकरणी FIR दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. आतापर्यंत २८ लोकांवर कारवाई करण्यात आले असून, अंबड पोलिस ठाण्यात गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी यांच्या चौकशी समितीने ७९.६७ कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराची पुष्टी केली आहे. शेतकरी संघटनांनी या घोटाळ्याच्या विरोधात आंदोलने केली असून, पूर्ण वसुली आणि दोषींवर कठोर कारवाईची मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी केली आहे.

**कनिष्ठ अधिकाऱ्यां मार्फत चौकशी न करता चौकशी समितीने स्वतः चौकशी करावी-आमदार लोणीकर -** जालना जिल्ह्यातील अंबड घनसावंगी परतूर मंठा जालना बदनापूर भोकरदन व जाफराबाद या आठही तालुक्यांमध्ये अतिवृष्टी अनुदान घोटाळे संदर्भात चौकशी करण्याचे आदेश चौकशी समितीला देण्यात आले आहेत त्यानुसार अंबड घनसावंगी व परतुर मध्ये चौकशी समितीने चौकशी केली देखील परंतु उर्वरित तालुक्यांमध्ये मात्र चौकशी समितीने मंडळ अधिकारी किंवा इतर तलाठ्यांमार्फत चौकशी करण्याचे काम सुरू केले आहे असे न करता उपजिल्हाधिकारी मनीषा दांडगे, उपजिल्हाधिकारी सविता सुत्रावे व नायब तहसीलदार नीलम लूनावत यांनी स्वतः या संदर्भात चौकशी करावी व शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासह दोषी अधिकाऱ्यांना पाठीशी न घालता कठोर भूमिका घ्यावी अशी सूचना देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक आणि उपजिल्हाधिकारी मनीषा दांडगे यांना केली आहे.

जालना जिल्ह्यामध्ये झालेला हा घोटाळा शेतकऱ्यांसाठी मोठा धक्का आहे, कारण अतिवृष्टीमुळे आधीच शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून अनुदान वाटपातील भ्रष्टाचारामुळे खऱ्या लाभार्थींना मदत मिळाली नाही. डिजिटल सिस्टम आणि पारदर्शकता वाढवल्यास असे घोटाळे टाळता येतील. वारंवार दुष्काळ परिस्थिती मुळे शेतकरी प्रचंड हतबल झालेला असून शेकडो कोटींचा घोटाळा शेतकरी कदापी सहन करणार नाही. तात्काळ वेगवान व पारदर्शिक चौकशी पूर्ण झाल्यानंतर सत्य बाहेर येईल. राज्य सरकारने याप्रकरणी एसआयटी स्थापन करून सखोल चौकशी करावी. या घोटाळ्याने महसूल विभागात खळबळ उडाली असून आणखी खुलासे होण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी कठोर कारवाई होणे गरजेचे आहे. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

## प्रा. राहुल म्हस्के यांना संगणक शास्त्र व माहिती तंत्रज्ञान विषयात पीएचडी प्रदान

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जाफराबाद जि. जालना, येथील संगणक शास्त्र विभागातील प्राध्यापक व विभाग प्रमुख प्रा. राहुल जनार्दन म्हस्के यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने संगणक शास्त्र व माहिती तंत्रज्ञान (Computer Science and Information Technology) या विषयात पीएच.डी. ही सर्वोच्च पदवी प्रदान केली आहे.प्रा. राहुल म्हस्के यांनी डॉ. प्राप्ती डी. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सायन्स अँड टेक्नॉलॉजी शाखेंतर्गत ऑटोमॅटिक फ्रुट कॉलिटी आयडेंटिफिकेशन सिस्टीम फॉर इमिनन्स इन्स्पेक्शन थ्रू कलर इमेज प्रोसेसिंग हा संशोधन प्रबंध विद्यापीठात सादर केला होता, विद्यापीठाने त्यांच्या या पीएच. डी. प्रबंधास मान्यता देऊन त्यांना 'संगणक शास्त्र व माहिती तंत्रज्ञान ' या विषयात पीएचडी पदवीची मान्यता दिली.

प्राध्यापक राहुल म्हस्के हे सिल्लोड शिक्षण संस्थेचे सचिव आहेत तसेच ते नालंदा मॅनेजमेंट अँड कम्प्युटर सायन्स महाविद्यालय ( बीसीए/ बीसीएस महाविद्यालय ) छत्रपती संभाजीनगर येथे प्रभारी प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विविध समित्यावर तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ सिनेट सदस्य, स्थायी समिती व व्यवस्थापन परिषद सदस्य म्हणून देखील विद्यापीठ प्राधिकरणावर त्यांनी कार्य केले आहे.

त्यांचे अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोधनिबंध प्रकाशित झालेले आहेत. ण..ए.( संयुक्त अरब अमिराती) येथील दुबई येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत डॉ. रावसाहेब कसबे डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, तसेच थायलंड येथील बँकॉक मध्ये भरलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद या आंतरराष्ट्रीय परिषदेत देखील त्यांना साहित्य क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे . नेपाळ येथील त्रिभुवनदास विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत देखील त्यांनी आपला शोध निबंध ( Research paper) सादर केला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात सादर केलेल्या संशोधनास विद्यापीठाने पीएचडी साठी प्रदान केल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. सिल्लोड शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. जनार्दनराव म्हस्के, उपाध्यक्ष भारत म्हस्के, श्री मधुकर शिनगारे, डॉ. बी.के. मगरे, डॉ.अमित पुंड, सिद्धार्थ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.टि. देशमुख ,उप प्राचार्य डॉ.एस. एल.मेढे, डॉ. एस. के.सजे. प्रा. विनोद हिवराळे,डॉ. आर.टि. उबाळे, प्रा. वाल्मीक वाघ, प्रा. हर्षपाल खाडे तसेच सिल्लोड शिक्षण संस्थेअंतर्गत शाळा-महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, नातेवाईक व मित्र आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



## डाव्या विचारसरणीची बुलंद तोफ कॉम्रेड सीताराम येचुरी

डाव्या विचासरणीचा बुलंद आवाज असे ज्यांचे वर्णन केले जाते ते कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी खासदार कॉम्रेड सीताराम येचुरी यांचा आज पहिला स्मृतिदिन. मागील वर्षी १२ सप्टेंबर २०२४ रोजी सीताराम येचुरी यांचे नुकतेच दीर्घ आजाराने निधन झाले होते. त्यांच्या निधनाने डाव्या विचारसरणीची बुलंद तोफ कायमची थंडावली. १२ ऑगस्ट १९५२ रोजी जन्मलेले सीताराम येचुरी हे भारतीय राजकारणातील प्रभावी व्यक्तिमत्त्व होते. विद्यार्थी दशेतच ते कम्युनिस्ट पक्षाकडे आकर्षित झाले. आपले शालेय व महाविद्यालयीन शिक्षण हैद्राबाद येथे पूर्ण करून उच्च शिक्षणासाठी त्यांनी दिल्ली गाठली. दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात त्यांनी अर्थशास्त्राची पदवी मिळवली. तिथेच ते स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडियात सक्रिय झाले. या संघटनेचे ते तीन वेळा महासचिव बनले. पुढे त्यांना या संघटनेचे अध्यक्षपद मिळाले. त्यानंतर ते कम्युनिस्ट पक्षात सक्रिय झाले. कम्युनिस्ट पक्षात त्यांनी विद्यार्थी, शेतकरी आणि कष्टकऱ्यांचे प्रश्न मांडण्यासाठी अनेक आंदोलने केली. त्यांनी केलेल्या आंदोलनाची दखल सरकारला घ्यावी लागली. त्यांच्या या कार्यामुळे कम्युनिस्ट पक्षाने त्यांना केंद्रीय सचिव पदावर काम करण्याची संधी दिली. १९९२ साली चेन्नई येथे झालेल्या कम्युनिस्ट पक्षाच्या १४ व्या कॉंग्रेसमध्ये त्यांची पक्षाच्या पॉलिट ब्युरो सदस्य म्हणून निवड करण्यात आली. कम्युनिस्ट पक्षाचे पॉलिट ब्यूरो सदस्य म्हणून त्यांनी भारतात कम्युनिस्ट पक्ष वाढवण्याचे मोठे कार्य केले. गावागावात, घराघरात कम्युनिस्ट पक्ष नेण्याचे प्रयत्न त्यांनी केला. त्यांच्या या प्रयत्नांना पश्चिम बंगाल, केरळ आणि त्रिपुरा या राज्यात मोठे यश मिळाले. या राज्यात कम्युनिस्ट पक्षाची सरकारे आली. संसदेतही कम्युनिस्ट पक्षाचे अनेक खासदार निवडून आले. सीताराम येचुरी हे स्वतः संसदेत निवडून गेले. संसदेतही त्यांनी विद्यार्थी, शेतकरी आणि कष्टकऱ्यांचे प्रश्न मांडले. आपल्या बुलंद आवाजाने आणि अभ्यासपूर्ण भाषणाने त्यांनी संसद दणाणून सोडली. सीताराम येचुरी यांच्यावर पक्षाने अनेक जबाबदाऱ्या सोपविल्या त्या त्यांनी लिलिया पेलल्या. त्यांनी पक्षाच्या आंतरराष्ट्रीय विभागाचे अध्यक्षपद सांभाळले. पक्षाचे मुखपत्र असलेल्या पीपल्स डेमॉक्रासी या नियतकालिकाचे संपादक पदही त्यांनी भूषवले. महाराष्ट्राचे प्रभारी पद ही त्यांनी सांभाळले. त्यांनी अनेक पुस्तकेही लिहिली. त्यांच्या निधनाने केवळ डाव्या विचरसरणीचीच नव्हे तर देशाची मोठी हानी झाली आहे. त्यांच्या निधनाने विद्यार्थी, शेतकरी आणि कष्टकरी यांच्या हितासाठी आयुष्यभर झटणारा एक विचारवंत, तत्वनिष्ठ नेता देशाने गमवला आहे. त्यांची पक्षनिष्ठा आणि पक्षाच्या विचाराशी असलेली बांधिलकी हा राजकारणाचा क्षेत्रात आदर्श ठरणार आहे. राजकीय भुमिकांबाबत मतभिन्नता असूनही मनभेद असू नयेत अशी निखळ मानवतावादी वृत्ती जपणारे ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते कॉम्रेड सीताराम येचुरी यांना पहिल्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन! कॉम्रेड सीताराम येचुरी यांना लाल सलाम !! कॉम्रेड सीताराम येचुरी अमर रहे!!!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## धनदांडग्या श्रीमंतांनी गोरगरीबांना आर्थिक मदत करावी

आपल्या भारत देशात जेवढे श्रीमंत लोक आहेत तेवढेच गरीब लोक पण आहेत. गरीब श्रीमंत दरी कमी न होता वाढत जात आहे. आणि अक्राळविक्राळ रूप धारण करत आहे. श्रीमंतांकडे अमाप व भरपूर पैसा आणि धनदौलत आहे, आणि करोडो रुपयांची संपत्ती व जमीन जुमला सुद्धा आहे. पैशाच्या बळावर ही श्रीमंत माणसे काही पण खरेदी करू शकतात. आलिशान गाडी व आलिशान बंगला आणि सोने नाणे खरेदी करून आपल्या रुबाबदार श्रीमंतीचे प्रदर्शन करतात. दारू, मटका, गांजा व पत्ते खेळण्याचा त्यांना भयानक नाद जडलेला असतो. या नादात म्हणजेच वाईट व्यसनात ते भरपूर पैसा बरबाद करतात. पैसा किती जातोय आणि पैसा किती येतोय याचा विचार ते जराही करत नाहीत. तर दुसरीकडे याच देशातील गरीब लोक एक वेळचे अन्न वेळेवर मिळत नाही म्हणून उपाशी मरत आहेत. आणि कर्जबाजारी पणामुळे अनेक गोरगरीब व तळागाळातील शेतकरी आत्महत्या करत आहेत. आणि लाख मोलाचे जीवन एका क्षणात संपवत आहेत. याचे कारण म्हणजे शेतात कायमचा दुष्काळ आणि पाऊस जर पडला तर अतिवृष्टी होते. या दुहेरी संकटात शेतकरी कायमचा अडकला आहे. मुलाबाळांचे शिक्षण आणि मुलींच्या लग्नाचा खर्च त्यांना भेडसावत आहे. म्हणून बहुतांश शेतकरी आर्थिक टंचाईमुळे व कर्जबाजारीपणामुळे गळफास लावून स्वतःची जीवनयात्रा संपवत आहेत. शासन सुद्धा गोरगरीब व सामान्य जनतेला न्याय देण्याऐवजी आणि त्यांना आर्थिक मदत करण्याऐवजी एकमेकांवर टीकाटिप्पणी करण्यात आणि राजकारण करण्यात मश्गुल झाले आहेत. त्यांना शेतकऱ्यांचा, शेतमजुरांचा, कामगारांचा आणि सुशिक्षित बेरोजगारांचा जराही विचार राहिलेला नाही. भारत सरकारने अशा वंचित, शोषित, उपेक्षित व तळागाळातील लोकांना आर्थिक मदत जाहीर करून त्यांचे जीवनमान उंचावणे काळाची गरज आहे, पण हे निष्क्रिय शासन शेतकऱ्यांना आर्थिक मदत न करता त्यांच्यावर अन्याय करत आहे, असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. या देशात अनेक लोक मोठमोठ्या पदावर अधिकारी आहेत. कोणी कलेक्टर आहे, कोणी अभियंता व इंजिनियर आहे, कोणी डॉक्टर व वकील आहे, कोणी मोठा उद्योगपती व कारखानदार आहे तर कोणी प्राध्यापक व तहसीलदार आहे. आणि यांच्याकडे गरजेपेक्षा जास्त भरमसाठ पैसा व संपत्ती आहे, पण हे धनदांडगे व श्रीमंत लोक या देशातील गरिबी दूर करण्यासाठी गोरगरीब, फुटपाथवर राहणारे, दुसऱ्याच्या शेतात सालगडी म्हणून राबणारे, पोटाची खळगी भरण्यासाठी भंगार गोळा करून जगणारे, गरजू , दुःखी व पीडित लोकांना आर्थिक मदत करून त्यांना मानसिक आधार द्यावा...गोरगरीब व सामान्य कुटुंबातील मुलींच्या लग्नाला आर्थिक हातभार लावावा...अनाथाश्रमात, वृद्धाश्रमात आणि आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना, अनाथांना व वृद्धांना जीवनावश्यक वस्तू म्हणजेच कपडे, अन्न व वह्या, पुस्तके आणि इतर वस्तू भेट देऊन त्यांना मायेचा व प्रेमाचा आधार द्यावा...या देशातील गरिबी कायमची दूर करण्यासाठी प्रत्येक श्रीमंतांनी व धनदांड्यांनी असा निर्धार करावा की, आम्ही आमच्या कमाईतील काही हिस्सा गोरगरिबांना, गरजूंना व दुःखी आणि पीडित लोकांना दान म्हणून देणार आणि त्यांची आर्थिक परिस्थिती भक्कम करणार असा निर्धार प्रत्येक श्रीमंतांनी, धनदांडग्यांनी म्हणजेच उद्योगपती, कारखानदार, संस्थाचालक, फिल्मी स्टार, क्रिकेटर आणि राजकीय लोकांनी जर मनापासून पक्का निर्धार केला तर देशातील गरिबी समूळ नष्ट झाल्याशिवाय राहणार नाही. त्यासाठी प्रत्येकाने आपल्यातील दायित्व दाखवून गोरगरीब मुला मुलींच्या शिक्षणासाठी व उपवर मुलींच्या लग्नासाठी थोडाफार आर्थिक हातभार लावून मुलींच्या पालकांना मानसिक आधार द्यावा... आपल्या भारत देशात कोट्याधीश व अब्जाधीश लोकांची संख्या प्रचंड प्रमाणात आहे. आपल्या देशातील गरिबी दूर करायची असेल तर अशा कोट्याधीश व अब्जाधीश लोकांनी सामाजिक दायित्व आणि आपल्यातील दानशूरता जागृत करून कर्जबाजारी व आर्थिक बाजू कमकुवत असणाऱ्या निराधार, अल्पभूधारक किंवा ज्यांना शेतीच नाही, अशा मागासलेल्या व गरजू शेतकऱ्यांना आर्थिक आधार देऊन त्यांची आर्थिक बाजू सक्षम करणे ही काळाची गरज आहे. श्रीमंत व धनवान लोकांनी कितीही पैसा कमावला, कितीही संपत्ती जमवली, आलिशान गाडी व आलिशान बंगला खरेदी केला आणि हातात व गळ्यात सोने घालून श्रीमंतीचे प्रदर्शन करण्यापेक्षा साधे व सिम्पल राहून गोरगरीब, वंचित, पीडित, शोषित, उपेक्षित आणि तळागाळातील मागासलेल्या लोकांच्या भल्यासाठी व उन्नतीसाठी आपण आपल्या कमाईतील थोडीफार आर्थिक मदत करून त्यांना सक्षम करावे.. देशात अनेक गरजू, भिकारी, फुटपाथवर राहणारे, भीक मागून खाणारे आणि ज्यांना राहायला अध्याप घर नाही अशी कितीतरी माणसे या भारत भूमीत आहेत. यांची आर्थिक परिस्थिती सक्षम करण्यासाठी आणि यांना गरिबीतून वर आणण्यासाठी धनवान व श्रीमंत लोकांनी यांना आर्थिक मदत म्हणून आर्थिक सहकार्य करावे. हीच माणसे उद्या आपल्याला मानव रूपातील देव मानतील... डोक्यावर घेऊन तुमचा जयजयकार करतील.. गरजवंताना, निराधारांना, शेतकऱ्यांना, शेतमजुरांना आणि कामगारांना आर्थिक मदत केल्याने तुमचे नाव दानशूर लोकांच्या यादीत घेतले जाईल... अशा गरजवंतांना आर्थिक मदत केल्यास जो आनंद मिळतो तो अवर्णनीय असतो...स्वतःसाठी तर सगळे जगतात पण कधी कधी दुसऱ्यासाठी सुद्धा जगून पाहावे लागते...आपल्या भारत भूमीत अनेक महामानव होऊन गेले त्यांनी स्वतःपेक्षा जास्त गरिबीने गांजलेल्या व पिचलेल्या समाजाला अधिक महत्त्व दिले...त्यांनी कोणत्याच गोष्टीचा स्वार्थ न बाळगता केवळ समाजाचा उद्धार करणे आणि समाजाला गुलामगिरीच्या चिखलातून बाहेर काढणे, हाच त्यांचा अजेंडा होता. म्हणून ते आजही समस्त भारतीयांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहेत. म्हणून शेवटी जाता जाता समस्त धनवान व श्रीमंत माणसांना एवढे सांगू शकतो की, बाबांनो कितीही पैसा कमवत बसू नका...कमावलेला पैसा समाजासाठी दान द्या...समाज मंदिर बांधणे, तरुणांसाठी जिमखाना उभा करणे, गावोगावी वाचनालय सुरू करणे आणि अडल्यानडलेल्यांना आर्थिक मदत करणे ही सेवाभावी वृत्ती अंगीकारून खूप खूप समाजसेवा करावी...माणसाला शेवटी जाताना काहीच घेऊन जायचे नाही...

माणूस जसा रिकाम्या हाताने आलाय, तसाच रिकाम्या हाताने जाणार आहे...पैसा, संपत्ती, गाडी व बंगला हे सर्व मागे सोडून जावे लागणार आहे. म्हणून पैशाची योग्य विल्हेवाट लावून समाजाचे काहीतरी देणे लागते म्हणून समाजासाठी व देशासाठी मुबलक पैसा उपयोगात आणावा आणि या देशातील गरिबी समूळ नष्ट करावी एवढेची माझी अपेक्षा आहे...

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# वैद्यकीय निष्काळजीपणा जिल्हा चौकशी समितीवर डॉ. राजीव जेथलिया यांची निवड




**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा स्तरावरील वैद्यकीय निष्काळजीपणाच्या प्रकरणांची चौकशी करण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सकांनी गठीत केलेल्या जिल्हा वैद्यकीय निष्काळजीपण चौकशी समितीवर महाराष्ट्र शासनाच्या अधिनस्त महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे (चचउ) प्रतिनिधी म्हणून जिल्ह्यातील प्रसिद्ध बालरोगतज्ञ डॉ. राजीव आर. जेथलिया यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

दि. २६ मार्च २०१० च्या शासन निर्णयानुसार प्रत्येक जिल्ह्यात रुग्णांच्या सुरक्षिततेसाठी व निष्पक्षतेसाठी वैद्यकीय निष्काळजीपण प्रकरणांची चौकशी करण्यासाठी अशी समिति गठीत करणे बंधनकारक करण्यात आलेले असून, या समितीमध्ये वैद्यकीय क्षेत्राचे प्रतिनिधी म्हणून महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचा प्रतिनिधी असणे आवश्यक आहे. डॉ. राजीव जेथलिया हे बालरोग तज्ञ म्हणून गत २५ वर्षांपासून वैद्यकीय सेवा क्षेत्रात कार्यरत असून, बालरोगविषयक विविध समस्या सोडवण्यासोबतच सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातही सक्रिय आहेत. त्यांनी २०२२-२३ मध्ये आयएमए जालना शाखेचे अध्यक्ष म्हणून जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडलेली आहे. याशिवाय, त्यांनी जिल्हा कोविड टास्क फोर्स तसेच आयएमए महाराष्ट्राच्या गर्भधारणा पूर्व आणि गर्भावस्थेतीलनिदान तंत्रांचा दुरुपयोग रोखण्यासंदर्भातील राज्य समितीमध्येही महत्त्वाची भूमिका पार पाडलेली आहे. सध्या ते आयएमए महाराष्ट्राचे सहसचिव म्हणून कार्यरत आहेत.

या नियुक्तीबाबत प्रतिक्रिया देताना डॉ. जेथलिया म्हणाले, ही जबाबदारी म्हणजे केवळ सन्मान नसून रुग्णांच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी आणि निष्पक्षपणे प्रकरणे तपासण्यासाठी मोठी संधी आहे. या कार्यात मी पूर्ण निष्ठा व पारदर्शकतेने काम करण्याचा प्रयत्न राहील, असे सांगून त्यांनी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे प्रशासक डॉ. विंकी रुघवानी, सहकारी, रुग्ण आणि कुटुंबीयांचे आभार मानले.

# जालना शहर महापालिकेला ९९३ पदांचा आकृतिबंध आराखडा मंजूर

## कामकाज गतिमान होऊन शहराच्या प्रगतीला नवे बळ मिळेल - आमदार अर्जुन खोतकर

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहराची महानगरपालिका घोषित झाल्यानंतर, तिच्या प्रशासकीय कामकाजाला गती देण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला ९९३ पदांचा आकृतिबंध आराखडा अखेर महाराष्ट्र शासनाने मंजूर केला आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे जालना शहराच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळणार असून, नागरिकांना मिळणाऱ्या सेवा अधिक प्रभावी आणि गतिमान होणार आहेत. हा महत्त्वपूर्ण निर्णय आमदार अर्जुन खोतकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे शक्य झाला आहे.

**नवीन पदांमुळे प्रशासनात कार्यक्षमता वाढणार**

या मंजूर झालेल्या आराखड्यात, शासनाने नव्याने ४१३ पदांना मान्यता दिली आहे. यात यापूर्वीच मंजूर असलेल्या ५४९ पदांचा आणि २२ ऑगस्ट २०२३ रोजी तात्पुरत्या स्वरूपात मंजूर झालेल्या ३१ पदांचा समावेश करून, एकूण ९९३ पदांचा अंतिम आकृतिबंध निश्चित करण्यात आला आहे. यामुळे जालना महापालिकेला अधिकारी आणि कर्मचारी यांची पूर्ण क्षमतेने उपलब्धता होणार आहे, ज्यामुळे प्रशासकीय कामकाज अधिक कार्यक्षम होईल.

**विभागनिहाय पदांची माहिती**

मंजूर झालेल्या पदांची विभागवार आकडेवारीत प्रशासकीय गट (अ, ब, क): १३२ पदे, तांत्रिक गट: ३४ पदे, लेखा विभाग: १२ पदे, अग्निशमन विभाग: ३५ पदे, गट ड (वर्ग ४): २०० पदे या पदांचा समावेश आहे.

या पदांमुळे नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा जसे की, पाणीपुरवठा, स्वच्छता, बांधकाम परवाने आणि इतर नागरी सुविधा अधिक चांगल्या प्रकारे पुरवल्या जातील.

**नवीन विभागीय कार्यालये (झोनल ऑफिसेस) सुरू होणार**

या नवीन आकृतिबंधामुळे शहरात ४ नवीन विभागीय कार्यालये (झोनल ऑफिसेस) सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यामुळे नागरिकांना महापालिकेच्या कामांसाठी दूर जावे लागणार नाही, तर त्यांच्या परिसरातील कार्यालयातच त्यांना आवश्यक सेवा सहज उपलब्ध होतील. यामुळे वेळेची बचत होईल आणि कामांमध्ये सुलभता येईल.

**शहराच्या प्रगतीला बळ मिळेल - आमदार अर्जुन खोतकर**

या यशाबद्दल बोलतांना आमदार अर्जुन खोतकर म्हणाले, जालना महानगरपालिकेचा ९९३ पदांचा आकृतिबंध मंजूर होणे हे जालना शहराच्या विकासाच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल आहे. नागरिकांना महापालिकेकडून दर्जेदार सेवा मिळाव्यात यासाठी मी सातत्याने शासनदरबारी पाठपुरावा केला. या पदांमुळे महापालिकेचे कामकाज अधिक गतिमान होईल आणि शहराच्या प्रगतीला नवे बळ मिळेल.

हा निर्णय जालना शहराच्या विकासासाठी एक मैलाचा दगड मानला जात असून, यापुढे शहराच्या विकासाची गती अधिक वाढेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# गोवंशीय मांसविक्री दुकानावर पोलिसांचा छापा; एक आरोपी ताब्यात, दुसरा फरार

**जालना -** शहराच्या मंगळबाजार परिसरात बेकायदेशीरपणे गोवंशीय जनावरांची कत्तल करून मांस विक्री केली जात असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी गुरुवारी (११ सप्टेंबर २०२५) सकाळी धडक कारवाई करत मोठ्या प्रमाणावर गोमांस जप्त केले आहे. या कारवाईत एका आरोपीला ताब्यात घेण्यात यश आले असून, त्याचा साथीदार मात्र फरार झाला आहे.

# युवकांनी स्वामी विवेकानंदांचा आदर्श घेऊन कार्य करावे - चंद्रशेखर दीक्षित




**जालना । प्रतिनिधी -** संपूर्ण ज्ञानाचा सागर म्हणजे स्वामी विवेकानंद होते युवकांनी त्यांचा आदर्श घेऊन कार्य करावे असे प्रतिपादन जेइएस महाविद्यालय जालना येथील स्वामी विवेकानंद केंद्राच्या युवा नेतृत्व गुण शिबिरात बोलताना केले.

जे ई एस महाविद्यालय जालना येथे स्वामी विवेकानंद केंद्रा तर्फे एक दिवशीय युवा नेतृत्व गुण विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. महावीर सदावर्ते होते कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक छत्रपती संभाजी नगर देवगिरी प्रांताचे प्रमुख श्री. चंद्रशेखर दीक्षित हे होते यावेळी व्यासपीठावर विवेकानंद केंद्राचे संचालक डॉ. नागनाथ शेवाळे, संजय जाधव, शुभम मंडोरे ,श्री दायमा यांची प्रमुख उपस्थिती होती.

या शिबिराचे प्रास्ताविक प्रा. डॉ.नागनाथ शेवाळे यांनी केले, युवकांनी स्वामी विवेकानंदांचे साहित्य वाचावे व त्याचे अनुकरणही करावे यामुळे युवकांच्या जीवनात परिवर्तन होईल असेही प्रास्ताविकात डॉ. शेवाळे यांनी सांगितले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना श्री चंद्रशेखर दीक्षित म्हणाले की युवकांनी विवेकानंदांचा आदर्श घेऊन कार्य करावे, विवेकानंद हे ज्ञानाचे सागर होते जीवनातील प्रत्येक क्षेत्रात त्यांचे कार्य आहे. अध्यात्मिक, शैक्षणिक राजकीय ,सामाजिक वेगवेगळ्या विषयांवर त्यांनी समर्पक असे मार्गदर्शन आपल्या साहित्यातून युवकांना केलेले आहे. विवेकानंदांचे कार्य जगभर पसरलेले असून ते महान आहे. स्वामी विवेकानंद हे सामान्य युवकांसाठी प्रेरणा स्तोत्र असून, अनेक युवकांनी त्यांची प्रेरणा घेऊन जीवनात वाटचाल केलेली आहे असेही श्री. दीक्षित यांनी सांगितले.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे, मराठी विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ.यशवंत सोनूने, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ वसंत पवार, डॉ. बाबू तोटरे, डॉ. प्रवीण पवार, प्रा.सतीश लोंढे, डॉ. किशोर बिरकायलु प्रा.लहाने, प्रा. भाग्यश्री बियाणी, आदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री शुभम मंढरे यांनी तर उपस्थितांचे आभार डॉ बाबुराव श्रीरामे यांनी मानलेत यावेळी महाविद्यालयातील युवक युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विश्वास वाघमारे यांचा निरोप समारंभ संपन्न

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** जिल्हा परिषद उच्च.प्राथमिक शाळा मेरखेडा येथून बदली झालेले विश्वास वाघमारे सर यांना शाळेच्या वतीने निरोप देण्यात आला. त्याप्रसंगी गावचे सरपंच सुखदेवराव जाधव, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष ज्ञानेश्वर जाधव, उपाध्यक्ष दिपकराव जाधव, गणेश आबा, माजी सरपंच कृष्णा जाधव, ग्रा.प.सदस्य गणेशरा जाधव, माजी अध्यक्ष बबनराव जाधव, तज्ञ सदस्य विनोदराव जाधव,सदस्य विष्णू जाधव, बंडू जाधव, संतोष जाधव, सखाराम जाधव, मुख्याध्यापक तथा प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष भगवान भालके व सर्व शिक्षक उपस्थित होते.



# राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेकरीता निवड चाचणीचे आयोजन

जालना/प्रतिनीधी - ईलेवन क्रिकेट फेडरेशन ऑफ इंडीया व आध्रप्रदेश ईलेवन क्रिकेट असोएिशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ११ ते १३ ऑक्टोंबर २०२५ दरम्यान गुटूंर आध्र प्रदेश या ठिकाणी सब ज्युनीयर व सिनीयर खेळाडुं करीता राष्ट्रीय ईलेवन क्रिकेट स्पर्धा २०२५ - २६ चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होण्याकरीता महाराष्ट्र राज्याचा संघ निवडण्याकरीता दि. १७ सप्टेंबर २०२५, बुधवार रोजी सकाळी १० वाजल्यापासुन जिल्हा क्रीडा संकुल जालना येथे निवड चाचणीचे आयोजन करण्यात आलेले आहे. निवड चाचणीमधुन सब ज्युनीयर वयोगटाकरीता १५ मुले व १५ मुली तसेच सिनीयर गटाकरीता १५ पुरूष व १५ महीला यांची निवड करण्यात येईल. निवड झालेले खेळाडु राष्ट्रीय ईलेवन क्रिकेट स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनीधीत्व करतील. सर्व स्पर्धा व निवड चाचणी लेदर बॉल वर घेण्यात येईल, सहभागी होणाऱ्या खेळाडुंनी आपले साहित्य स्वतः आणायचे आहे. निवड चाचणीमध्ये सहभागी होण्याकरीता सबज्युनीयर वयोगटाकरीता खेळाडुची जन्म तारीख ०१/०१/२०१० किंवा नंतरची असावी, सिनीयर वयोगटासाठी वयाचे बंधन नाही. निवड चाचणीत सहभागी होण्याकरीता सबज्युनीयर गटासाठी दोनशे रूपये व सिनयर गटासाठी तिनशे रूपये शुल्क आकारण्यात येईल. अधिक माहीतीसाठी शेख चाँद पी.जे. मो.नं.९८२२४५६३६६ किंवा ॲड. अमजत पठाण, शेख रहेमत, उमेशचंद्र खंदारकर, नितीन जाधव, संतोष वाघ, श्रीमती शेख महेजबीन, श्रीमती गिता संगम, श्रीमती किरण पाटील, शेख समीर, सोहेल खान यांच्याशी संपर्क साधावा. तरी निवड चाचणीमध्ये जास्तीत जास्त खेळाडुंनी सहभागी व्हावे असे आवाहन ईलेवन क्रिकेट असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या वतीने करण्यात आलेले आहे.








हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.